# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेसनोट दि. ०४/१०/२०२०

## पिंपरी चिंचवड गुन्हे शाखा, युनिट-३ ची कामगिरी

## जबरी चोरी करणारे सराईत गुन्हेगार यांचेकडून सोन्याची चैन व ९५,०००/- रुपये च्या ०२ मोटार सायकली जप्त

दिनांक ०४/१०/२०२० रोजी गुन्हे शाखा, युनिट ३, पिंपरी चिंचवड कडील अधिकारी व कर्मचारी हे दिघी पोलीस ठाणे हददीत देहुफाटा ते मोशी रोडवर गुन्हे प्रतिबंधात्मक पेट्रोलिंग करीत असताना दोन इसम आर.टी.ओ. नंबर एमएच १४ डीपी ५४५२ पल्सर मोटर सायकलवर देहुफाटा ते मोशी रोडने मोशीचे दिशेने जात असताना दिसले सदर मोटर सायकलस्वारांचा संशय आल्याने त्यास थांबण्याचा इशारा केला असता ते न थांबता तसाच पुढे जावू लागले म्हणून त्यांचा सोबतच्या स्टाफच्या व वाहतुक शाखेचे पोलीस पोशि/अप्पासाहेब जायभाय यांचे मदतीने पाठलाग करून थोडयाच अंतरावर मोटर सायकलसहपकडून त्यांना आहे त्या स्थितीत ठेवून त्याचे नाव व पत्ता विचारता त्यांनी त्यांची नावे १) मोटार सायकल चालविणारा :- विजय भाउसाहेब गायकवाड वय-३८ वर्षे रा. आळेफाटा शिक्षक कॉलनी जवळ ता.जुन्नर जि.पुणे २) मागे बसलेला :- संदिप सुखदेव शिंदे वय- २७ वर्षे, भोजदरी ता. संगमनेर जि. अहमदनगर असे असल्याचे सांगितले. आम्हास पाहून पळून जाण्याचे कारण व त्यांचेकडील असणारी मोटर सायकल बाबत विचारपूस करता त्यांनी काही एक समाधानकारक माहीती दिली नाही, म्हणून त्यांचे ताब्यातील बजाज कंपनीची पल्सर मोटर सायकल आर.टी.ओ.नंबर एमएच १४ डीपी ५४५२ ही ताब्यात घेवून अधिक तपास करता जबरी चोरीतील सोन्याची चैन १५ ग्रॅम वजनाची किंमत रुपये ७५,०००/- व दोन मोटर सायकल किंमत रुपये ९५,०००/- असा एकुण किंमत रुपये १,७०,०००/- रुपये चा मजप्त करुन खालील गुन्हे उघडकीस आणले आहेत.

१) निगडी पोलीस ठाणे गु.र.नं.१०५/२०२० भा.दं.वि.कलम ३९२,३४
२) देहुरोड पोलीस ठाणे गु.र.नं.६४१/२०२० भा.दं.वि.कलम ३७९
३) घारगांव पोलीस ठाणे गु.र.नं.३४५/२०२० भा.दं.वि.कलम ३७९

सदर आरोपींना पुढील कारवाईकामी निगडी पोलीस ठाणे यांचे ताब्यात रिपोर्टसह हजर केले आहेत.सदर आरोपींचे पुर्व चारीत्र पडताळता त्यांचेवर खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) खेड पोलीस ठाणे गु.र.नं.२७/२०१९ भा.दं.वि.कलम ३९२,३४
२) संगमनेर पोलीस ठाणे गु.र.नं.३३/२०१९ भा.दं.वि.कलम ३७९,३४
३) खेड पोलीस ठाणे गु.र.नं.४०/२०१९ भा.दं.वि.कलम ३९२,३४
४) खेड पोलीस ठाणे गु.र.नं.६७/२०१९ भा.दं.वि.कलम ३७९,३४

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, श्री. कृष्णप्रकाश, मा. अपर पोलीस आयुक्त श्री.रामनाथ पोकळे, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. सुधिर हिरेमठ, मा. सहा पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.आर.आर. पाटील यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर बाबर, सहायक पोलीस निरीक्षक सतिश कांबळे, पोलीस उप निरीक्षक गिरीश चामले, कर्मचारी - हजरत पठाण, यदु आढारी, नाथा केकाण, सचिन मोरे, विठठल सानप, गंगाधर चव्हाण, योगेश्वर

कोळेकर, महेश भालचिम, राजकुमार हनमते, सागर जैनक, त्रिनयन बाळसराफ, प्रविण पाटील, राहुल सुर्यवंशीव प्रमोद ढाकणे यांनी केली आहे.